कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) च्या वरीष्ठ महाविद्या-लय स्थानिक व्यवस्थापन समितीची सभा आज बुधवार दि. ८ ऑगस्ट २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयाचे सभागृहात संपन्न झाली. सा सभेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे:—

सभेस खालील पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. —

| अ.नं. | नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १ | मा. श्रीमती पवार निलीमाताई वसंतराव | अध्यक्षा | (signed) |
| २ | मा. श्री. गायकवाड जयवंतराव जयराम | सदस्य | (signed) |
| ३ | मा. श्री. चौधरी विठ्ठलराव त्र्यंबक | सदस्य | (signed) |
| ४ | मा. श्री. कदम रत्नाकर विनायकराव | सदस्य | |
| ५ | मा. श्री. बोरस्ते चंद्रभान बाबुराव | सदस्य | (signed) |
| ६ | मा. श्री. गायखे भास्करराव बबनराव | सदस्य | (signed) |
| ७ | मा. श्री. कदम अरुण भाऊराव | सदस्य | |
| ८ | मा. श्री. शेजवळ विष्णू कचरु | सदस्य | (signed) |
| ९ | मा. श्री. वाबळे रामनाथ कचरु | सदस्य | (signed) |
| १० | मा. प्राचार्य डॉ. ए. पी. पाटील | सचिव | (signed) |
| ११ | प्रा. ठाकरे रमाकांत हंसराज | प्राध्यापक शिक्षक प्रतिनिधी | (signed) |
| १२ | प्रा. श्रीमती पुरकर शकुंतला नाना | —"— | (signed) |
| १३ | प्रा. भदाणे प्रदीपकुमार रघुनाथ | —"— | (signed) |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | प्रा. श्रीमती वाघ सुनंदा लानाजी | प्राध्यापक प्रतिनिधी | [signature] |
| १५ | प्रा. पटेल एस. आर. | —"— | [signature] |
| १६ | श्री लिडके लक्ष्मण संभू | प्राध्यापकेतर प्रतिनिधी | [signature] |

सभेच्या अध्यक्षा श्रीमती निलिमा पवार या अनुपस्थित असल्यामुळे मानदीय श्री जयवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु झाले.

जादा विषय क्र. १ :- दु:खवटा

ठराव क्रं. १) संस्थेचे आधारस्तंभ, माजी, सभापती सरचिटणीस कर्म. कै. मालोजीराव सदाशिवराव मोगाळ यांचे दु:खद निधन झाले तसेच ज्ञात-अज्ञात दु:खद निधन झालेल्यांना ही सभा शोक व्यक्त करीत आहे सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली

प्रारंभी प्राचार्य डॉ. एन.पी. पाटील यांनी प्रास्ताविक करुन महाविद्यालयातील कामकाजबाबत, अडीअडचणी भविष्यातील आवश्यक इमारत बांधकाम, भारताचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या बाबत सभेस माहिती देऊन विवेचन केले.

विषय क्रं.- १) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

ठराव क्रं. २) मागील सभेच्या इतिवृत्ताचे वाचन समितीचे प्राध्यापक प्रतिनिधी भदाणे प्रदिपकुमार रघुनाथ यांनी केले. इतिवृत्तावर साधकबाधक चर्चा होऊन इतिवृत्त सर्वानुमते कायम करण्यात आले.

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचक :- श्री बोरसे चंद्रभान बाबुराव

अनुमोदक :- प्रा ठाकरे रमाकांत हंसराज

विषय क्रं. २. सन. २०१३-१४ चे खर्च-उत्पन्न पत्रक, तेरीज व ताळेबंदास मंजूरी देणे

ठराव क्रं. ३. महाविद्यालयाचे कार्यालय अधीक्षक व समितीचे प्राध्यापकेतर प्रतिनिधी श्री लिडके लक्ष्मण संभू यांनी सभेपुढे २०१३-१४ चे ऑडिटेड कामकाज आर्थिक पत्रके सभेपुढे मांडले त्यावर चर्चा होऊन सन २०१३-१४ चे आर्थिक पत्रकांस मंजुरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचक :- श्री गायकवाड भास्करराव बबन

अनुमोदक :- श्री शेजवळ विष्णू काचरु.

पुढील पानावर →

विषय क्रं ३ सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकास मंजूरी देणे
ठराव क्रं. ४ महाविद्यालयाचे सन २०१४-१५ चे आर्थिक अंदाजपत्रक समितीचे सचिव तथा प्राचार्य डॉ. मु.पी. पाटील यांनी सभेपुढे मांडले, त्यावर विचार विनिमय होऊन अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक :- श्री. वाबळे रामनाथ कचरू

अनुमोदक :- प्रा. डॉ. एस. आय. पटेल

विषय क्रं. ४. महाविद्यालयासाठी आवश्यक असलेले वाढीव इमारत बांधकामाबाबत निर्णय घेणे.
ठराव क्रं. ५. महाविद्यालयाची वाढीव विद्यार्थीसंख्या वर्गांची संख्या वाढल्याने सध्याची इमारत अपुरी पडत आहे पहिल्या मजल्यावरील पुर्वेकडील उरवरित बांधकाम होणे अत्यंत जरुरीचे आहे अपुऱ्या इमारतीमुळे प्रयोगशाळेत दाटीने विद्यार्थी बसवून प्रात्यक्षिक घेणे अशक्य आहे. शासनाने निर्धारित केलेल्या मोजमापानुसार इमारत अपुरी दिसते त्याचा परिणाम शासकीय तपासणीत शेरेमारून अनुदानावर परिणाम होऊ शकतो त्यामुळे तातडीने बांधकाम हाती घेणे आवश्यक आहे. ही निकड प्राचार्यांनी सभेपुढे मांडली त्यावर गांभीर्याने विचारमंथन होऊन संस्थेने त्वरीत बांधकाम सुरू करावे असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक :- श्री. चौधरी विठ्ठलराव त्र्यंबक

अनुमोदक :- प्रा. श्रीमती पुरकर शकुंतला नाना

विषय क्रं. ५. महाविद्यालयाच्या शैक्षणिक अडीअडचणीबाबत विचारविनिमय करणे.
ठराव क्रं. ६. कालानुरुप स्पर्धेत टिकण्यासाठी महाविद्यालयाची भौतिक गुणात्मक प्रगती होणे गरजेचे आहे मात्र त्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक निधीची आवश्यकता आहे शासनाचे नियम व सामाजिकतेचे भान ठेवून निधी उभारणे अत्यंत अवघड असे काम आहे. यासाठी पालक व विद्यार्थी यांना जाणीव करून देवून जादाचा निधी उभारण्याची प्रक्रिया सुरू करणे आवश्यक आहे. नवीन इलेक्ट्रॉनिक शैक्षणिक उपकरणे गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक निधी लागतो. कालानुसार हा खर्च गरजेचा असल्याने व महाविद्यालयाची आर्थिक स्थिती

बघता पालकांकडून स्वेच्छेने विकासनिधी घेवून ही गरज भागविण्यात यावी.

आपल्या महाविद्यालयात नाशिक शहराच्या बरोबरीने भौतिक सुविधा व कुशल तज्ञ प्राध्यापक आपल्या महाविद्यालयात उपलब्ध आहे. जनतेमध्ये याची जाणीव करून देवून विद्यार्थी आपल्याकडे वळविण्याच्या कसोशिने प्रयत्न करण्यात यावा त्यासाठी पालक मेळावा घेवून माहिती करून देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

सूचक :- प्रा. ठाकरे रमाकांत हंसराज

अनुमोदक :- श्री बोरसे चंद्रभान बाबुराव.

सभेपुढे ऐनवेळचा विषय नसल्यामुळे अध्यक्षांच्या परवानगीने कामकाज संपले. प्रा. पी. आर भदाणे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे मानले.

मंजूर
२०/3/२०१५

Patil

डॉ.ए.पी.पाटील
प्राचार्य
कला.विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
ओझर(मिग),ता.निफाड,जि.नाशिक